# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
# Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी - २२८२१७२८, २२८२११६७
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


क्रमांक – ७४४(५)/६२१४/पंधरा

दिनांक - १४ ऑगस्ट, २०२०

## घोषणा (कक्ष पंधरा)

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे खाली नमूद केलेल्या पदांच्या मुलाखती दिनांक २ सप्टेंबर, २०२० रोजी आयोगाच्या उपरोक्त पत्त्यावरील मुख्य कार्यालयात आयोजित केल्या असून मुलाखतीस पात्र ठरलेल्या उमेदवारांना त्यांच्या प्रोफाईलमध्ये मुलाखतपत्र पाठविण्यात येत आहेत. तसेच त्यांना sms द्वारे देखिल कळविण्यात येत आहे. मुलाखतीस पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

| अ.क्र. | जाहिरात क्रमांक | पदाचे नाव | मुलाखत दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| १ | ७०/२०१५ | वास्तुशास्त्रज्ञ, गट - अ, सार्वजनिक बांधकाम विभाग | दि. २ सप्टेंबर, २०२० सकाळ ९.३० |
| २ | ५९/२०१७ | सहायक संचालक (माहिती)/माहिती अधिकारी/अधिपरिक्षक, पुस्तके व प्रकाशने माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, गट – ब (राजपत्रित) | |

विचाराधीन पदाच्या मुलाखतीस पात्र ठरलेल्या सर्व उमेदवारांनी मुलाखतीच्या दिवशी प्रमाणपत्र तपासणीवेळी अर्जात दाव्या पृष्ठयर्थ आवश्यक ती सर्व मूळ प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. ती सादर न केल्यास मुलाखत घेतली जाणार नाही. तसेच मूळ कागदपत्रे/ प्रमाणपत्रे सादर करण्याकरिता कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही. या बाबींची सर्व संबंधीत उमेदवारांनी नोंद घ्यावी.

कोरोना विषाणूचा (Covid १९) प्रादूत्भाव वाढू नये यासाठी उमेदवारांनी घ्यावयाची काळजी.

१) मुलाखतीला उपस्थित सर्व उमेदवारांनी पूर्णवेळ Mask चा वापर करणे अनिवार्य आहे.

२) वैयक्तिक स्वच्छतेचे पालन काटेकोरपणे करणे आवश्यक आहे.

३) उमेदवारांकडे स्वत:चा Sanitizer असावा त्याचा वापर आवश्यकतेनुसार करावा.

४) उमेदवारांनी Social Distancing चे योग्य प्रकारे पालन करावे.

५) मुलाखतीला येताना उमेदवार शक्यतो एकटे यावे, कार्यालयात नातलगांची उगाच गर्दी करू नये.

६) उमेदवारास Covid सदृश्य लक्षणे जसे की ताप, सर्दी, खोकला इ. दिसून येत असल्यास कार्यालयास आगाऊ कळवावे.

ठिकाण : मुंबई
दिनांक : १४ ऑगस्ट २०२०

उप सचिव (सरळसेवा)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग